# <u>महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालय</u>

महाराष्ट्र विधानमंडळाच्या ग्रंथालयाची स्थापना 18 मार्च 1922 रोजी झाली. सन 1919 च्या कायद्याप्रमाणे 1921 साली त्यावेळच्या मुंबई प्रांताचे पहिले लोकनियुक्त कायदेमंडळ अस्तित्वात आले व विधानमंडळ सदस्यांच्या माहिती संबंधीच्या अनेकविध गरजा भागविण्यासाठी व वेगवेगळे कायदे करताना आवश्यक ते सर्व संदर्भसाहित्य, माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी या ग्रंथालयाची स्थापना झाली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे ग्रंथालय हे समृद्ध व सुसज्ज असून ते पुर्णतः वातानुकुलित आहे. नवीन विधानभवनाच्या इमारतीमध्ये 5 व्या व 6 व्या मजल्यावर ते व्यवस्थापित करण्यात आलेले आहे. महाराष्ट्रातील हे एक महत्त्वाचे व विशेष स्वरुपाचे संदर्भ ग्रंथालय असून प्रामुख्याने केवळ विधानमंडळाच्या सन्माननीय सदस्यांसाठी आहे. मात्र, विशेष अभ्यासक, संशोधक, वृत्तपत्रांचे प्रतिनिधी यांना संदर्भसेवा व अन्य प्रकारच्या ग्रंथालयामध्ये उपलब्ध होऊ न शकणारी अशा स्वरुपाची विधिमंडळ ग्रंथालयामधूनच मिळू शकणारी माहिती मागणीनुसार अन्य कोणालाही या ग्रंथालयामधून दिली जाते. विधानमंडळाच्या सन्माननीय सदस्यांना लागणारी पुस्तके, सभागृहाच्या मागील कामकाजाची कार्यवाही वृत्ते (Debates), अहवाल, वृत्तपत्रांतील विविध विषयांवरील महत्त्वाच्या बातम्या व लेखांची कात्रणे तसेच, नियतकालिकांतील लेख इ. माहिती सन्माननीय सदस्यांच्या मागणीनुसार पुरवून त्यांची सभागृहातील व सभागृहाबाहेरील संसदीय कर्तव्ये व जबाबदाऱ्या परिणामकारकरित्या व समाधानकारकपणे पार पाडण्यास त्यांना सहाय्य करणे हा या ग्रंथालय सेवेच्या व्यवस्थेमागील प्रमुख उद्देश आहे.

- **कामाच्या वेळा** :-

नि:सत्र कालावधीत सकाळी 10.45 ते सायंकाळी 5.30 या कार्यालयीन वेळेत व सत्र काळात सभागृहाचे कामकाज सुरु होण्यापूर्वी एक तास ते सायंकाळी सभागृहाचे कामकाज आटोपेपर्यंत किंवा 6.30 या दोन्हीपैकी जी वेळ नंतरची असेल त्या वेळेपर्यंत ग्रंथालय सेवा उपलब्ध असते.

- **अंदाजपत्रकीय वार्षिक तरतूद :-**

ग्रंथालयासाठी दरवर्षी ग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके इत्यादींच्या खरेदी व बांधणीसाठी रुपये 15 लाख इतकी अंदाजपत्रकीय आर्थिक तरतूद करण्यात येते.

* **कर्मचारी वर्ग :-**

ग्रंथालयामध्ये सध्या कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या एकूण 23 इतकी आहे. त्याबाबतचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी -वर्ग 1 | .. | 1 |
| उप-ग्रंथपाल-वर्ग-2 | .. | 1 |
| तांत्रिक सहायक | .. | 4 |
| सहाय्यक | .. | 5 |
| लिपिक | .. | 5 |
| टंकलेखक | .. | 1 |
| दप्तरी | .. | 2 |
| शिपाई/हमाल | .. | 4 |
| एकूण | .. | 23 |